राज्यातील देवस्थानाच्या जमिनीची तपासणी
तसेच या जमिनी बेकायदेशीर हस्तांतरीत झाल्या
असल्यास पूर्ववत देवस्थानांच्या नांवे करण्याबाबत

le Apt for detailed action plan for CR Collector

**महाराष्ट्र शासन,**
शासन परिपत्रक क्र. डीईव्ही-२०१०/प्र.क्र.९/ल-४,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३० जुलै, २०१०

3/07/10

DCR

**प्रस्तावना :-**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर शासनाच्या धोरणानुसार इनाम / वतने / जहागिरी नष्ट करण्यात आलेली आहेत. मात्र राज्यातील देवस्थान इनामे अद्यापि शासनाने खालसा केलेली नाहीत. या देवस्थान इनाम जमिनीच्या उत्पन्नातून देवस्थानांचा खर्च भागविणे अभिप्रेत आहे. याच कारणाने जमिनींना पूर्वापार, पूर्णतः वा अशंतः सारामाफी देण्यात आलेली आहे. अंशतः वा पूर्णतः सारामाफी असलेल्या देवस्थान जमिनीचे हस्तांतरण बेकायदेशीरपणे वा शासनाच्या परवानगीशिवाय होत असल्याच्या बऱ्याच तक्रारी शासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत. नुकत्याच तुळजांभवानी देवस्थान, तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद या देवस्थानाच्या जमिनी अन्य व्यक्तींच्या नांवे बेकायदेशीरपणे हस्तांतरीत झाल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या होत्या व चौकशी अंती त्यात तथ्य असल्याचे आढळून आले आहे.

२. या संदर्भात देवस्थानाच्या / मठ / सेवा (सर्व धर्मांच्या) इनाम जमिनींच्या तपासणीची धडक मोहीम जिल्हास्तरावर राबविण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना याव्दारे देण्यात येत आहेत. अशा तपासणीत बेकायदेशीररित्या वा शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय हस्तांतरित झालेल्या जमिनी, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन देवस्थानाच्या ताब्यात पूर्ववत देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी असे करताना सर्व साधारणपणे पुढीलप्रमाणे कालबध्द कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

१) जिल्ह्यातील सर्व देवस्थान इनाम जमिनींची माहिती संकलीत करणे,

सर्व तहसिलदारांनी त्यांच्याकडील तालुका नमुना नं.३ मधील तसेच लॅन्ड अॅलीनेशन रजिस्टर मधील देवस्थान इनामाच्या जमिनीची माहिती संकलित करावी. तसेच गाव नमुना नं.३ लॅन्ड अॅलीनेशन रजिस्टर मधील अशा नोंदी एकाच दिवशी धडक मोहिमेव्दारे तपासाव्यात व तालुक्यातील सर्व गावांच्या इनाम जमिनींची यादी संकलित करावी.

देवस्थान इनाम जमिनीची तालुकानिहाय / गावनिहाय यादी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी पुढील नमुन्यात तयार करावी.

महसूल

| जिल्हा | तालुका | गांव | संबंधित देवस्थान / मठ इ. | गट नं. सर्व्हे नं. | क्षेत्र | ७/१२ उताऱ्याप्रमाणे वहिवाट दाराचे / भोगवटा धारकाचे नांव | सदर नांव कोणत्या फेरफार क्रमांकानुसार आले तो फेरफार क्रमांक | सदर फेरफार ज्या आदेशानुसार झाला तो आदेश क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

देवस्थान इनामाच्या नोंदी या इतर कार्यालयामध्ये देखील उपलब्ध असतात. (उदा.वक्फ बोर्ड किंवा जिल्हा वक्फ अधिकारी, सह धर्मादाय आयुक्त) या सर्व कार्यालयात विशेष दूत पाठवावे व त्याचेकडून देवस्थान किंवा धार्मिक इनाम जमिनीची माहिती संकलित करावी.

याप्रमाणे माहिती संकलीत करताना जमिनींचे ७/१२ व त्याचे फेरफार काढून ते तपासावेत. ही प्रक्रिया <u>दिनांक १५ ऑगस्ट २०१० पर्यंत पूर्ण करावी.</u>

**२) <u>संबंधित जमिनीचे सद्याचे मालकी हक्क, फेरफार प्रत्यक्ष परिस्थितीप्रमाणे तपासणे,, तसेच फेरफार आदेशांची कायदेशीर वैधता तपासणे :-</u>**

अशा प्रकारे संकलित झालेल्या यादीतील सर्व जमिनीचे ७/१२ उतारे काढून घ्यावे व त्यातील भोगवटादार म्हणून कोणा - कोणाची नावे आहेत ते तपासावे जर संबंधित देवस्थान /मठ वगळता इतर व्यक्तीचे नावे ७/१२ वर आली असल्यास अशी नावे कोण - कोणत्या फेरफारानुसार येत गेली त्या फेरफारांची यादी करावी व ते फेरफार देखील काढून घ्यावेत. त्यानंतर त्या प्रत्येक फेरफाराचा काळजीपूर्वक अभ्यास करावा. असे फेरफार कोणत्या आदेशानुसार झाले आहे ते सर्व आदेश प्राप्त करावेत.

वरील पध्दतीने संकलित सर्व फेरफार आणि आदेश यांचे सखोल काळजीपूर्वक वाचन करावे. अनेक प्रकरणी इनाम जमीनी बेकायदेशीररित्या हस्तांतरित झाल्याचे दिसून आले आहे. उदा. वक्फ अधिनियम १९९५ कलम ५१ (जुना वक्फ अधिनियम १९५२ कलम ३६ अ) नुसार वक्फ बोर्डाच्या अधिसूचीत झालेल्या जमीनीचे वक्फ बोर्डाच्या पूर्व परवानगीशिवाय कुणालाही हस्तांतरील करता येत नाही. दि हैद्राबाद अतियात इन्क्वायरी ॲक्ट १९५२ कलम ६ नुसार मराठवाडा विभागातील देवस्थान इनाम जमिनीचे कुणालाही हस्तांतरीत करता येत नाही. देवस्थान इनाम जमीनीला कूळकायदा लागू नसल्याने त्यास कूळ लावून जमीन कूळाला देता येत नाही.

मुळात या सर्व भोगवटादार वर्ग-२ जमीनी असल्यामुळे अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत विहित कार्यपध्दती अवलंबल्याशिवाय आणि सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व परवानगी शिवाय जमिनीचे हस्तांतरण होऊ शकत नाही. असे हस्तांतरण आढळून आले असल्यास त्या आदेशांची वैधता तपासून पहावी. बेकायदेशीर असलेल्या सर्व आदेशांविरुध्द संबंधित कायद्याखाली उचित न्यायालयात अपील दाखल करावे. विलंबाचा मुद्दा उपस्थित झाल्यास संबंधित महसूल न्यायालयाने अशा प्रकरणात लवचिक धोरण स्वीकारुन विलंब क्षमापित करावा. त्यासाठी Collector Land Acquistion Anantnag V/S Mst. Katiji 1987 SCF BRC, 147 at pp 147, 148 A.I.R. 1987 SC 1363, 1364 या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा आधार घेता येईल.

काही फेरफार असे आढळून येऊ शकतात की, ते कोणत्याही सक्षम न्यायालयाचे आदेश नसतांनाही महसूल खात्यातील कर्मचाऱ्यांनी (तलाठी / मंडळ अधिकारी) खाजगी व्यक्तीचे संगनमताने बेकायदेशीररित्या ते केलेले आहेत. असे सर्व फेरफार देखील महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम २५७ नुसार पुनरीक्षणात घ्यावेत आणि उप विभागीय अधिकारी यांनी संबंधित प्रकरणे विलंब क्षमापित करुन हाताळावीत.

अशा पध्दतीने ज्या फेरफाराविरुध्द किंवा आदेशाविरुध्द अपील दाखल करावयाचे आहे त्यांची यादी ३१ ऑगस्ट २०१० पर्यंत संकलित करावी आणि अशी सर्व अपीले १५ सप्टेंबर २०१० पर्यंत दाखल करावीत. सदर सर्व अपिले संबंधित महसूली न्यायालयाने दि.३१ मार्च २०११ पर्यंत निकाली काढावेत.

३) **सर्व जमिनींची प्रत्यक्षात पहाणी करणे :-**

इनाम जमिनींची यादी तयार झाल्यावर वरील प्रक्रिया करित असतांना सर्व जमिनींना संबंधित मंडळ अधिकारी आणि तलाठी स्वत: भेटी देतील आणि ज्या अटी व शर्तीवर इनाम जमिनी बहाल केल्या आहे त्या अटी व शर्तींची पूर्तता झाली आहे काय, सदर जमिनी इतरांच्या ताब्यात अनधिकृतपणे गेल्या आहे काय, त्यावर अतिक्रमणे झाली आहेत काय, या सर्व बाबी तपासाव्यात व आढळून आलेल्या परिस्थितीनुसार उचित कार्यवाही करावी. उदा.अतिक्रमण काढून टाकणे, शर्तभंग झाला असल्यास जमीन सरकारजमा करणे इत्यादि.

तात्पुरत्या स्वरुपाची अनियमितता असल्यास त्यावर उचित कार्यवाही करावी. उदा.दि हैद्राबाद अतियात इन्क्वायरी ॲक्ट १९५२ ज्या जमिनींना लागू आहे त्याची कलम ७ नुसार विरासत मंजूरीची कार्यवाही झालेली नसल्यास जमिन एकसाली लागणसाठी घ्यावी व संबंधित विलंब क्षमापनाच्या अर्जासह विरासत मंजूरीच्या कार्यवाहीसाठी दाखल करण्यासाठी सूचीत करावे.

प्रत्यक्ष भेटी देऊन याबाबत वस्तुस्थितीदर्शक अहवाल तयार करण्याची कार्यवाही दि.१५ ऑगस्ट, २०१० पर्यंत करावी व त्यानुसार उचित कार्यवाही दि.३१ सप्टेंबर २०१० पर्यंत पूर्ण करावी.

४) **आढावा :-**

सर्व जिल्हाधिकारी यांनी तहसिलदार / उपविभागीय अधिकारी यांचेकडून केलेल्या कार्यवाहीचा सखोल आढावा घ्यावा. त्याचप्रमाणे सर्व विभागीय आयुक्तांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून या संदर्भात कालबध्द आढावा घ्यावा व वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल दिनांक ५ ऑक्टोबर २०१० पर्यंत विभागीय आयुक्तांनी शासनास सादर करावा. ही सर्व कार्यवाही करीत असताना झालेल्या अनियमिततेसंदर्भात जे अधिकारी / कर्मचारी दोषी आढळतील त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्तांनी करावी.

५) वर नमूद तक्ता DVB-TTSurekh फॉन्ट १६ मध्ये टाईप करावा व विभागनिहाय संकलित केलेला परिच्छेद २ मध्ये नमूद तक्ता संबंधित विभागीय आयुक्तांनी sec-revenue@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर शासनाकडे पाठवावा.

६) या सर्व कार्यवाहीबाबत संबंधित जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांच्या तहसीलदार व अति.जिल्हाधिकारी वार्षिक मूल्यमापनात नोंद घेण्यात येईल व यासाठी मूल्यमापन करण्यासाठी PAR चा नमुना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( रमाकान्त असमर )
शासनाचे सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड, औरंगाबाद,
धर्मादाय आयुक्त,
निवडनस्ती कार्यासन ल-४, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई